# अहिल्यानगर महानगरपालिका,अहिल्यानगर

दुरध्वनी क्र.(कार्यालय) ०२४१- २३४३६२२,२३४५१२७,२३४०५२२
अग्निशमन विभाग :-०२४१ -२३२३३७०, फॅक्स नं०२४१.-२३२८८३७
Website : www.amc.gov.in E-mail : amc_anr@rediffmail.com


अशाद/जा.क्र.४५४ दि. ०९ /०९/२०२६

प्रति,

पी.एम. श्री. केंद्रिय विद्यालय

न.२ एम.आय.आर.सी.दरेवाडी,

अहिल्यानगर

विषयः प्रोव्हीजनल अग्निशमन ना हरकत प्रमाणपत्राच्या मुदतवाढी बाबत.

संदर्भः१) आपला दिनांक ०७/०१/२०२५ रोजीचा अर्ज

२) आपला दिनांक १७/०८/२०२६ रोजीचा मुदत वाढ मिळणे बाबतचा अर्ज

महोदय,

उपरोक्त विषयानुसार कळविण्यात येते कि, पी.एम. श्री. केंद्रिय विद्यालय न.२ एम.आय.आर.सी.दरेवाडी ,अहिल्यानगर येथील बांधकाम क्षेत्रफळ २९२२.४४ चौ.मी. इतके असून येथे शैक्षणिक इमारतीचे बांधकाम करावयाचे असुन सादर केलेल्या कागद पत्रानुसार व खालील तक्त्यात दर्शविल्या प्रमाणे इमारतीसाठी खालील प्रमाणे बांधकाम करिता, महाराष्ट्र अग्नि प्रतिबंधक जीवसंरक्षक् व उपाययोजना अधिनियम २००६ (सुधारणा)मुख्य अधिनियम २०२३ अन्वये व राष्ट्रीय इमारत बांधकाम संहिता २०१६मधील भाग ४ अनुसूची-एक अन्वये अग्नि सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातुन खालील प्रमाणे उपाय योजना करणे आवश्यक व बंधनकारक आहे.

| NO | FLOOR | Area In Sq.Mt | Building Hight |
|---|---|---|---|
| 1 | GROUND FLOOR | 1461.22SQ.M | MTRS |
| 2 | FIRST FLOOR | 1461.22SQ.M | |
| | TOTAL | 2922.44SQ.M | |

१)सदर प्रोव्हिजनल ना हरकत प्रमाणपत्र हे दिलेल्या तारखेपासुन एक वर्ष मुदतीकरिता आधारभुत राहिल.हि मुदत संपण्यापुर्वी त्याचे नुतनीकरण करुन घ्यावे लागेल व प्रचलित नियमानुसार योग्य त्या वेळी केले जाईल .

२) इमारतीमध्ये IS:२१९०:१९९२ प्रमाणे प्रत्येक १०० चौ .मि. क्षेत्रासाठी एक अग्निशामक उपकरण बसविण्यात यावे.

३) इमारतीमधे IS:८८४ : १९८५ व ३३८४ : १९८९ प्रमाणे होजरील होज प्रत्येक मजल्याच्या जिन्याजवळ बसविण्यात यावे.

४) इमारतीमध्ये IS:१६४६:१९९७ प्रमाणे विद्युत वायरिंग इनस्टॉलेशन करण्यात यावे.

५) सदर इमारतीमध्ये यार्ड हायड्रन्ट बसविण्यात यावे.

६) सदर इमारतीमध्ये ऑफीस,लॅब व आवश्यक त्या ठिकाणी स्प्रिंकलर सिस्टीम बसविण्यात यावे.

७) सदर इमारतीमध्ये मॅन्युअली ऑपरेटेड ईलेक्ट्रीक फायर अलार्म सिस्टम बसविण्यात यावे.

८) इमारतीच्या अंडर ग्रांउड २५००० लिटर क्षमतेची अग्निशमन करिता पाण्याची टाकी व त्यावर १२०० LPM क्षमतेचा इलेक्ट्रीक पंप १ नग व डिझेल १२०० LPM १ नग ,जॉकी १८० LPM १ नग बसविण्यात यावेत.

९)सदर इमारतीमध्ये फायर सर्व्हिसेस इनलेट टू वे बसविण्यात यावे.

१०)भारतीय इमारत बांधकाम संहिता २०१६ मधील भाग ४ मधील ४.४.२ ४.३ नुसार किमान दोन स्टेअर केस असणे आवश्यक असून जिण्यांची रुंदी २.०० मीटर पेक्षा कमी असू नये.

११) दोन्ही जिने बंदिस्त असतील व त्यातील एक जिना इमारतीच्या बाहेरील बाजुस असावा व तो इमारतीच्या आवारातच म्हणजेच इमारतीच्या सामांतीक अंतरात सुरक्षित ठिकाणी उघडणे अपेक्षित आहे.

१२) भारतीय राष्ट्रीय इमारत संहिता २०१६ च्या भाग ३ मधील परिच्छेद ८.३.१ डी. अन्वये इमारतीच्या भोवतालची सामासिक अंतर (marginal open space) किमान ६ मिटर पेक्षा कमी असता कामा नये.

१३)सदर इमारतीमध्ये स्थायी अग्निशमन यंत्रणा बसविणेबबत (फायर फायटींग डिझाईन )नकाशा/ आराखडा या कार्यालयास सादर करुन मान्यता घेतल्यानंतर कार्यवाही करण्यात यावी.

उपरोक्तप्रमाणे अग्निप्रतिबंधक यंत्रणा सदर इमारतीमध्ये बसविणे आवश्यक आहे व उपरोक्त प्रमाणे स्थायी अग्निशमन यंत्रणेचे काम महाराष्ट्र अग्नि प्रतीबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना २००६ अन्वये लायसंन्स प्राप्त अभिकरनामार्फत करणे आवश्यक आहे.

सबब उपरोक्त प्रमाणे अग्निप्रतिबंधक यंत्रणा सदर इमारतीमध्ये कार्यान्वित करुन अहवाल इकडेस सादर करण्यात यावा म्हणजे अंतिम अग्निशमन ना हरकत प्रमाणपत्र देणेबाबत कार्यवाही करणे शक्य होइल याची नोंद घ्यावी.

**महाराष्ट्र आग प्रतिबंधक जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ मधील अधिनियम १५ अन्वये "केंद्र सरकार किंवा राज्य शासन किंवा कोणतेही प्राधिकरण यांच्याकडे निहित असलेल्या किंवा त्यांच्या नियंत्रणा खाली किंवा ताब्यात असलेल्या कोणत्याही इमारतीवर कोणतीही फी आकारण्यात येणार नाही " अशी तरतूद असल्याने सदर इमारतीस फी आकारण्यात आलेली नाही.**

अहिल्यानगर महानगरपालिका अग्निशामक दल अहिल्यानगर

(शंकर उत्तम मिसाळ )
मुख्य अग्निशमन अधिकारी
अहिल्यानगर महानगरपालिका